|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## *Affiliation* (संलग्नता विभाग)

जा.क्र. कबचौउमवि /5/196/2020 दिनांक : 7.8.2020

प्रति,

मा.प्राचार्य,

महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे,

श्रीमती शरदचंद्रिका सुरेश पाटील कॉलेज ऑफ फार्मसी चोपडा,

जि. जळगांव.

विषय: शैक्षणिक वर्ष 2020-21 पासून कायम संलग्नीकरणाबाबत.....

संदर्भ: आपल्या महाविद्यालयाने माहे ऑगस्ट 2019 मध्ये सादर केलेला कायम संलग्नीकरणाचा प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कायम संलग्नीकरणाबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या पायाभुत सोयी-सुविधा तथा इतर बाबीं बाबत परिसंस्थेची तपासणी करुन अहवाल सादर करणेसाठी प्राप्त आदेशान्वये विद्यापीठाव्दारा प्राचार्य डॉ.व्ही.आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दोन सदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीने महाविद्यालयास भेट देवून सादर केलेला अनुषंगिक अहवालास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 च्या कलम 116 नुसार मान्यता देणे आवश्यक आहे. तथापी मा.विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 च्या कलम 12 (7) नुसार घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने नमुद करण्यात येते की, खालील तक्यात नमुद केलेले विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत चार वर्षीय अभ्यासक्रमांच्या विषय/तुकडयांना शैक्षणिक वर्ष 2020-21 पासून कायम संलग्नीकरणास मान्यता देण्यात येत आहे. कायम संलग्नीकरण मिळालेल्या विषयांकरीता दरवर्षी वार्षिक संलग्नता शुल्क भरणे आवश्यक राहिल.

| अ.क्र. | अभ्यासक्रम |
|---|---|
| 1 | बी. फार्मसी (प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष ) |

तथापि,ज्या मान्यताप्राप्त विषयांना/तुकडयांना शैक्षणिक वर्ष 2020-21 पर्यंत पाच वर्ष पूर्ण झालेली नसतील किंवा कायम संलग्नीकरण मान्य झालेले नाही अशा विषयांचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आवश्यक राहील याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासु

(ग.मा.पवार)

सहा.कुलसचिव (संलग्नता)

प्रत माहितीसाठी:

1) अखिल भारतीय तकनिकी शिक्षा परिषद(ए.आय.सी.टी.ई.) नेलसन मंडेला मार्ग, वसंत कुंज, जनपथ, नवी दिल्ली- 110070.
2) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- 32.
3) मा. शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य-3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. 1967, मुंबई -1.
4) मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नविन शासकिय तंत्रनिकेतन परीसर, पो.बॉ. नं. 219, सामनगांव रोड, नाशिक रोड, नाशिक.
5) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि जळगांव.
6) सहा. कुलसचिव, अभ्यासमंडळ प्रवेश व पात्रता विभाग, कबचौउमवि जळगांव.

Smt.Sharadchandrika Suresh Patil College of Pharmacy Chopda-425107 Dist-Jalgaon